# तोष्णीवाल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ड-झोन मैदानी स्पर्धेत यश




















## तोष्णीवाल महाविद्यालयाच्या खेळाडूंचे मैदानी स्पर्धेत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

सेनगाव : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व के.के.एम. महाविद्यालय मानवतच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ड' झोन मैदानी स्पर्धा घेण्यात आली. या ॲथलॅटिक्स स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालयातील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन खेळाडू हनुमान विकास गाढवे (भालाफेक- प्रथम), अभिषेक रामचंद्र रोडगे (८०० मीटर धावणे- प्रथम), हनुमान विकास गाढवे (लांब उडी-द्वितीय), शेख आसेफ शेख रजाक (उंचउडी- तृतीय), ओम हनुमान कन्हेरकर (१,५०० मीटर धावणे- प्रथम), हनुमान विकास गाढवे (१०० मीटर धावणे- तृतीय) क्रमांक पटकाविला.

खेळाडूंच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष बी.आर. तोष्णीवाल, सचिव यू.एम. शेळके, उपाध्यक्ष सुभाष एकशिंगे, महाविद्यालयीन विकास समिती अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर, प्रा. हेमंत शिंदे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.



दैनिक मराठवाडा केसरी

## तोष्णीवाल महाविद्यालयाच्या खेळाडूंचे मैदानी स्पर्धेत यश

सेनगाव – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व के. के. एम. महाविद्यालय,मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ड– झोन मैदानी अथलॅटिक्स स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालयातील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

सदरील स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन खेळाडू हनुमान विकास गाढवे भालाफेक स्पर्धेत प्रथम,अभिषेक रामचंद्र रोडगे ८०० मीटर धावणे प्रथम, हनुमान विकास गाढवे लांब उडी स्पर्धेत द्वितीय, शेख आसेफ शेख रजाक उंच उडी मध्ये तृतीय , कन्हेरकर ओम हनुमान १५०० मीटर धावणे प्रथम , कन्हेरकर ओम हनुमान ५००० मीटर धावणे द्वितीय , हनुमान विकास गाढवे १०० मीटर धावणे तृतीय , कन्हेरकर ओम हनुमान १०००० मीटर धावणे प्रथम , पटकावत महाविद्यालयीन खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थाअध्यक्ष बी.आर.तोष्णीवाल, सचिव यु.एम.शेळके, उपाअध्यक्ष सुभाषआप्पा एकशिंगे, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ.एस.जी.तळणीकर व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. सदर स्पर्धेसाठी क्रीडा विभाग प्रमुख प्रा. हेमंत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.